वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी-४३१ ४०२
Web.http://www.vnmkv.ac.in meal. reg_mau@rediffmail.com fax. ०२४५२-२२९७५५,२२३५८२

# २६ वा दीक्षांत समारंभ

## जाहिर प्रकटीकरण

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचा २६ वा दीक्षांत समारंभ दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण कार्यालय परिसरातील सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृहात आयोजीत करण्यात येणार आहे. मा. कुलपती महोदय तथा मा. राज्यपाल महोदय, महाराष्ट्र शासन श्री सी. पी. राधाकृष्णन हे दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भुषवतील तर प्रतिकुलपती तथा मा. मंत्री कृषि महाराष्ट्र शासन श्री माणिकराव कोकाटे हे दीक्षांत समारंभास सन्मानित अतिथी म्हणून उपस्थित राहतील. या दीक्षांत समारंभात भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. हिमांशु पाठक कुमार हे दीक्षांत समारंभास प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित राहुन दीक्षांत अभिभाषण करणार आहेत. दीक्षांत समारंभात सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी पूर्ण करणा-या स्नातकांना पदवी अनुग्रहीत करण्यात येणार आहे. पदवी अनुग्रहीत करण्यात येणा-या स्नातकांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. दीक्षांत समारंभाच्या यादीत नाव असणा-या स्नातकांनीच कार्यक्रमास उपस्थित राहावे असे मा. कुलसचिव, वनामकृवि, परभणी यांनी कळविले आहे.

विद्यापीठातील विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी तसेच इतर मान्यवरांनी विद्यापीठाचा २६ वा दीक्षांत समारंभ आभासी पध्दतीने प्रसार माध्यमावर पहावा असे प्रा. (डॉ.) इन्द्र मणी, मा. कुलगुरु महोदय, वनामकृवि, परभणी यांनी नमुद केले आहे. सदर कार्यक्रमाची वेब लिंक विद्यापीठ संकेतस्थळावर दोन दिवस अगोदर प्रसिध्द करण्यात येईल. ज्या पदवीधरांची नावे विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसुचनेत सुचिवध्द असतीलन त्यांनाच दीक्षांत दिंडीत सहभागी होण्याची परवानगी दिली जाईल. दीक्षांत समारंभास उपस्थित असलेल्या स्नातकांना समारंभानंतर पदवी प्रमाणपत्रे देण्यात येतील व उर्वरीत स्नातकांना त्या दिवशी त्यांच्या संबंधीत महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्रे उपलब्ध करुन देण्यात येतील.

दीक्षांत समारंभ वेळेवर सुरु होणार असल्यामुळे सर्व संबंधीत स्नातकांनी वेळेच्या एक तास अगोदर विद्वत दिंडीत सहभागी होण्यासाठी कार्यक्रम स्थळी यावे तसेच विद्यावस्त्रे दीक्षांत समारंभाच्या एक दिवस अगोदर किंवा समारंभाच्या दिवशी सकाळी आठ च्या आत संबंधीत विद्याशाखेतुन प्राप्त करावीत.

(संतोष वेणीकर)
**कुलसचिव**

जा. क्र.२०२४/जा.प्र./२६ वा दी.स./विद्या-३
दिनांक : ०१ जानेवारी २०२५

Scanned with OKEN Scanner

Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth
Parbhani – 431 402
Web.http://www.vnmkv.ac.in meal. reg_mau@rediffmail.com fax. 02452-229755, 223582

## NOTIFICATION OF 26th CONVOCATION CEREMONY

The 26th Convocation Ceremony of Vasantrao Naik Marathwada Krishi Vidyapeeth, Parbhani will be held on 23rd January, 2025 in the Golden Jubilee Convocation Hall in the premises of Student Welfare Office. Hon'ble Shri C. P. Radhakrishnan Hon'ble Chancellor and Governor of Maharashtra state will preside over the Convocation Ceremony. Hon'ble Shri Manikrao Kokate, Hon'ble Pro-Chancellor and Minister of Agriculture Maharashtra state will be the Guest of Honour Dr. Himanshu Pathak, Secretary (DARE) and Director General (ICAR) will be the Chief guest of this ceremony and he will deliver Convocation address on this occasion.

The graduates who have completed their UG, PG and Ph.D. degree programmes in the academic year 2023-24 will be conferred the degrees in 26th Convocation Ceremony. The list of graduates is made available on the University website www.vnmkv.ac.in. In the Convocation Ceremony, only those graduates whose names are listed in the notification displayed on the University website will be allowed for Convocation procession.

The Hon'ble Vice-Chancellor, VNMKV, Parbhani Prof (Dr.) Indra Mani has informed that all other students and staff of VNMKV, Parbhani should attend the programme through virtual mode. The link of this programme will be posted on the website of the University two days in advance. Degree certificates will be issued to those students who are attending the programme on the same day and the remaining graduates can collect their degree certificates on the same day onwards from their respective Colleges.

(Santosh Venikar)
**Registrar**

No.2025/Noti. /26th Con./Acad-3
Date : 01 Jan. 2025

Scanned with OKEN Scanner